२४६५) २४६५
२४६० २४६४ / साकेतांक क्र 199912172२ १०९ (९८४)

क्रमांक : एकत्रि/संकीर्ण /प्र.सु./९९

पुणे, दिनांक :- १७/१२/१९९९

ती प त्र क :

मा. मंत्री [महसूल] यांच्याकडे दिनांक २/१२/९९ रोजी झालेल्या ...े शासनाने एकत्रिकरण कायदा १९४७ व त्याखालील १९५९ चे नियम ... करण्याचा मानस व्यक्त केलेला आहे.

त्यानुसार शासनाने प्रस्तुत कायदा रद्द केलेनंतर त्यामधील कायदा व नियम रद्द केलेनंतर आपले विभागात या योजने अंतर्गत चालू असलेली सर्व कामे रद्द होतील व त्यानंतर अनेक कायदेशीर अडचणी निर्माण होतील यास्तव खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

कायदा कलम २४[१] अन्वये प्रमाणपत्रे जी शिल्लक आहेत ती त्वरेने नोंदणी करुन वाटप करणेची आहेत. तसेच गटवार आकारबंद कामे त्वरेने पूर्ण करणेची आहेत. कायदा कलम ३१[अ] अन्वये व कायदा कलम ३२[१] नुसार मंजूर झालेले शुध्दीपत्रक व दुरुस्ती योजनेचे अनुसरण काम त्वरेने पूर्ण करणेचे आहे.

तक्रारी अर्ज चौकशीची व त्या अनुषंगाने अनुसरण कामावर प्रत्येक तालुक्यांत बरीच प्रकरणे शिल्लक आहेत. आता प्रत्येक अधीक्षक भूमि अभिलेख/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी कालबध्द कार्यक्रम करुन माहे मार्च ९९ अखेर सर्व प्रकरणे निकाली होतील अशी कार्यवाही करणेची आहे.

वरील प्रमाणे कार्यवाही झाली नाही व काही काम शिल्लक राहील तर त्यात कायदा रद्द झाल्यास अडचणी निर्माण झालेस, तो कार्यालय प्रमुख व्यक्तीशः जबाबदार राहील.

सही/- xxxxx
[एन्. डी. सावळे]
उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे.

प्रत :- सर्व अधीक्षक भूमि अभिलेख
सर्व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना माहितीसाठी.

" नि र्ग मि त "

अधिक्षक भूमि अभिलेख, सलग्न
उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे.